Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. ( III )
18 Feb. 2019 Special Issue - 130

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

**Co-Editor**
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar
Dr. A.B. Barure

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# INDEX

1. Human Rights: Types And Significance 13
**D. K. Andhale and T. A. Gitte**

2. Female Feticide – Human Rights violation in India 17
**Mr. Kulkarni G. A., Mr. Kulkarni P.V.**

3. "Human Rights in Indian Constitution" 21
**Prof. N. B. Devkate**

4. The Propagation of Equality and Freedom for Women through Family and Socio-cultural Channels in Mariama Bâ's *So Long a Letter* 24
**Dr. Jayant S. Cherekar**

5. The Role Of Goverment To Protect The Human Rights Human Rights For Education 27
**Prof.B.K. Amlapure**

6. Right To Education And Higher Education In India 30
**Dr. Suresh T. Samale**

7. Human Rights : Characteristics and Types 33
**Ankush T. Karpe**

8. Role of human rights commission to protect the Human Rights. 35
**Mr.N.S.Waghmare**

9. Human Rights and Migration in *The Circle of Reason* of Amitav Ghosh 37
**Dr. Vasant Bhivaji Gaikwad**

10. An Analytical Study on Human Rights in Changing Scenario of International Relations 39
**Mr.Sagar Sharad Kulkarni**

11. Human Rights for Education 43
**Dr. C. R. Dapke**

12. Human Rights Of Women In Indian Perspectives 45
**Dr. Amreen Sultana Mohd. Khalil**

13. Legal Protection of Farmer Rights 48
**Dr. Ravikumar Gangaram Suryavanshi**

14. The Tribal Issue and Human Rights 52
**Chandrakant Balaji Bhise**

Late Rajesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist. Parbhani



15. Human Rights: Functions And Importance 56
**B . G . Patil**

16. Understanding The Right To Health 58
**Dr. Swati S. Ardhapurkar**

17. Mrs. Bharti Patel : Gender Biased Mother in Mahesh Dattani's Play Tara 61
**Dr. M. S. Rajpankhe**

18. The Role of Literature in the Protection and Preservation of Human Rights 63
**Shivnarayan Waghmare**

19. Human Rights In Indian Constitution : A Brief Review 68
**Dr.Vaishali E. Aher**

20. Perspectives of Human Right in Indian English Fiction 70
**Prof. Mane Rajabhau Sidaji**

21. Human Rights and children 73
**Dr.Ranee Jagannathrao Jadhav**

22. Human Rights of Women in India –A Current Scenario Analysis 76
**Dr. Mrs. Manisha Vinay Aole**

23. Human Rights & Women 79
**Dr. Meena S. Kadam**

24. Libraries And Human Rights 81
**Mr.Sunil T. Bhosale**

25. Role of Government in providing education and skill-orientation in post liberalization period. 83
**Ms. Shital K. Rawal**

26. Importance, Characteristics and Types of Human Rights 86
**Mr. Sandip Haribhau Shirsath**

27. Baby Kamble's *The Prisons We Broke*: The Rebel against the Patriarchal ociety 89
**Arya Dhanaji Wamanrao**

28. Human Rights Protection of Tribal Community through Good Governance . 92
***Datta B. Jadhav***

29. Provisions and Agencies for Protecting Human Rights 95
30. **Sanjay B. Salunke**

31. **Human Rights in World perspectives** 98
**Dr. Rajendra D. Shinde**

Sonpeth Pin-431 ... Warpudkar ACS College ... Sonpeth Dist. Parbhani



48. भारतीय शासन आणि मानवी हाक्क 135
प्रा.डॉ. भारत भोपु राठोड

49. मानवी हक्क व महिला सबलीकरण 136
प्रा. डॉ. अरुण अन्नासाहेब सोळंके

50. भारतीय महीलांची सामजिक स्थिती आणि मानवाअधिकार 138
गोविंद द. बावस्कर

51. मानव अधिकार आणि संस्कृत भाषा 141
भांगे वीणा गोविंद

52. 'असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या मानवी अधिकाराचो वस्तुस्थिती' 143
डॉ. माणिक सोनावणे

53. मानवी हक्क आणि महिलांचे सबलीकरण 145
डॉ. चव्हाण यशवंत बाबुराव

54. मराठीतील आई विषयक कवितेतून मानव अधिकाराचे जतन 148
प्रा.डॉ. संजय खाडप

55. मानवी हक्क आणि बालक 149
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)

56. अल्पसंख्याक व मानवी हक्कांचे उल्लंघन 152
डॉ. किशन मनोहर पवार

57. मानवी अधिकार व भारतीय संविधान 154
डॉ. बिडवे टी. एस.

58. मानवाधिकार आणि महिला 156
ढवळशंख मंजूषा नेताजी

59. मानव अधिकार आणि भारत १५८
प्रा.डॉ.नामानंद गौतम साठे , डॉ.वनमाला गोविंदराव गुंडरे

60. " भारतीय राज्यघटना आणि महिला सबलीकरण " 160
प्रा. डॉ. सलामपुरे फुलचंद, प्रा. डॉ. वाटोरे सुनिता

61. मानवी हक्क: ग्रंथालयातील दृष्टिकोन 163
माधव गोरख घोडके

62. मानवी अधिकार आणि वृध्दांच्या समस्या 167
जयसिंग पोपटसिंग सिंगल, अनिल आनंदराव जेवळीकर

63. "राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि मानवी हक्क संरक्षण" १७०
प्रा. अनंत दादाराव मरकाळे

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (III) | Feb. 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# मानवी हक्क आणि बालक

प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

---

**प्रस्तावना :**

मानवी हक्क म्हणजे असे सर्व हक्क जे प्रत्येकास निसर्गतःच मिळालेले असतात. ज्यांच्याशिवाय आपण माणूस म्हणून जगू शकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे मानवी हक्क जन्मतः मिळालेले असे हक्क आहेत, जे माणसाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी, मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी संवर्धनासाठी, बौध्दिक, वैचारिक व सद्सद् विवेक बुध्दीच्या वाढीसाठी महत्वांचे आहेत. तसेच ते मानवाच्या आध्यात्मिक व इतर गरजा भागविण्या करिता आवश्यक असतात. मानवी हक्क माणसांपासून वेगळे करता न येणारे, जन्मसिध्द हक्क असतात. मानवी हक्कांशिवाय आपण माणूस म्हणून जगू शकत नाही, हे सिध्द झाले आहे. या सर्व हक्कांमध्ये सर्व मूलभूत स्वातंत्र्याचा समावेश होतो.

`माणसे एकमेकांपासून भिन्न असतात, परंतु मानवी हक्कांच्या संकल्पेनूसार मनुष्य कुठल्याही धर्म, जात, जमात, वर्ण, लिंग, भाषा, वंश, व जन्मस्थळाचा असला तरी तो समान असतो. त्याला समानतेची हमी मिळायला हवी. प्रत्येक व्यक्तीला सन्मानपुर्वक जीवन जगण्याची हमी देण्याच्या राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संस्था संघटनाच्या उदिष्टांमधून मानवी हक्कांची संख्या व व्याप्ती यात सातत्याने वाढ होत आहे. प्रत्येक बालकास जगण्याचा, स्वातंत्र्याचा व सुरक्षिततेचा हक्क आहेच. मात्र त्याचबरोबर शिक्षण,आरोग्य आणि इतर हक्क हे त्याला सन्मानपुर्वक जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात.`[1]

**संशोधन पध्दती :-**

**तथ्यसंकलन :-** प्रस्तूत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. संदर्भ ग्रंथ, मासिक, शासकीय दस्ताऐवज व इंटरनेटचा समावेश आहे.

**उद्देश :-**

1) मानवी हक्कांची संकल्पना स्पष्ट करणे.
2) बालकांच्या हक्कांविषयी माहिती घेणे.
3) बालकांच्या हक्काची आवश्यकता स्पष्ट करणे.
4) बाल हक्काच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कायद्याची माहिती घेणे.

**गृहितकृत्य :-**

`बालहक्क कायद्यामुळे बालकांना मध्यान भोजन मिळत आहे.`

**मानवी हक्क :-**

संयुक्त राष्ट्र आमसभेने 10 डिसेंबर 1948 रोजी श्रीमती ऑलनोर रूझवेल्ट यांच्या अध्यक्षते खाली `मानवी हक्काचा सार्वत्रिक जाहीरनामा` संमत व स्वीकृत केला. या जाहीरनाम्यानूसार मानवी हक्क समान पध्दतीने मिळणे व प्रत्येक मानवाच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हे जागतिक स्वातंत्र्य, न्याय, समता यांचा पाया आहे. मानवी हक्काचे संरक्षण होणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. असे स्पष्ट करण्यात आले.

**मानवी हक्काचा अर्थ :-**

जॅक मारिते यांच्या मते, ``मानवी हक्क हे सर्व व्यक्तींना आणि सर्व काळात असतात म्हणन ते निराळे आहेत. विशिष्ट स्थानातून प्राप्त होणारे ते हक्क नाहीत, माणसाच्या माणूसपणातून प्राप्त होणारे हे हक्क आहेत.``[2]

डवार्किन यांच्या मते, ``मानवी हक्क हे मानवाला मिळालेले असे अधिकार आहेत की ज्या अधिकारांचे सार्वजनिक हिताचे कारण सांगून राज्यही उल्लंघन करू शकत नाही आणि हे मानवी हक्क कोणत्याही राष्ट्रीय कायद्याशिवाय मानसाला उपभोगता येऊ शकतात.``[3]

मानवी हक्क हे व्यक्तिला माणूस म्हणून लाभलेले हक्क आहेत. राज्याच्या मान्यतेशिवाय हे हक्क व्यक्तीला प्राप्त होतात. माणूस म्हणून प्राप्त होणाऱ्या मानवी हक्कांना स्थळ, काळ व क्षेत्राचे बंधन असत नाही. मानवी हक्काचे स्वरूप हे वैश्विक असून जन्माने ते व्यक्तीला प्राप्त होतात. मानवी हक्क व्यक्तीच्या आत्मप्रतिष्ठेसाठी अत्यावश्यक असतात.

**बालहक्क :-**

वर्डस्वर्थ यांच्या मते, ``बालक, मनुष्याचा पिता आहे.`` म्हणजेच प्रौढ व्यक्तीची उत्पादनक्षमता त्या संधीवर अवलंबून असते जी त्याला बालक असतांना विकसित आणि मोठे करण्यासाठी प्राप्त होते. अर्थात बाल्यावस्था हीच व्यक्तीच्या भवितव्याची पायाभरणी असते. या दृष्टीने जेम्स पी.ग्राम्के यांचे मत अतिशय अनुकूल आहे ते म्हणतात,`` बालकांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाची सुरक्षा आपल्या समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये होणाऱ्या सर्व गुंतवणूकीपेक्षा सर्वात अधिक महत्त्वाची असते. यावरून बालहक्काचे जतन होणे किती गरजेचे आहे हे स्पष्ट होते.

20 नोव्हेंबर 1989 मध्ये बालहक्काचा जाहीरनामा सर्वांनुमते स्वीकारला गेला. आणि 2 सप्टेंबर 1990 रोजी तो प्रत्यक्ष अमलात आणला गेला. या जाहीरनाम्यानूसार 18 व्या वर्षाखालील प्रत्येक व्यक्ती, बालक आहे. या जाहिरनाम्यानूसार प्रत्येक बालकास जीविताचा हक्क, राष्ट्रीयत्वाचा हक्क, अभिव्यक्तीचा हक्क, बालमजुरांच्या शोषणाविरोधी हक्क, कोटुंबिक वातारवणाचा हक्क, शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे.

बालहक्क जाहिरनाम्यात जागतिक बालकांना खालील हक्क प्रदान करण्यात आले आहेत.

1) जीविताचा व विकासाचा हक्क.
2) नाव व राष्ट्रीयत्त्वाच्या प्राप्तीचा हक्क.
3) अभिव्यक्ती विचार व धर्मस्वातंत्र्याचा हक्क.
4) कोटुंबिक जीवनाच्या लाभाचा हक्क.
5) पालकांकडुन योग्य संगोपणाचा हक्क.
6) शारीरिक, मानसिक, नेतिक व सामाजिक विकास होईल आणि उत्तम जीवनमानाचा दर्जा प्राप्तीची हक्क.
7) सामाजिक सुरक्षिततेचा हक्क.
8) आरोग्याच्या सुविधा प्राप्त करण्याचा हक्क.
9) मोफत व सक्तीचे शिक्षण मिळविण्याचा हक्क.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



10) वयाला अनुसरून खेळ, करमणूक, सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचा व विश्रांती घेण्याचा हक्क.

11) सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षणाचा हक्क.

2002 मध्ये पुन्हा एकदा संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेने बालकांसाठी एक खास अधिवेशन बोलावून `मुलांसाठी योग्य विश्व` या नावाने एक दस्तऐवज स्वीकारला.

**भारत सरकारद्वारे बालहक्काच्या संरक्षणासाठी उपाय योजना :-**

स्वातंत्र्यानंतर बालकांचे कल्याण व काळजी घेणे या क्षेत्रातील राज्यसरकारी जबाबदारी वाढली. भारतीय संविधानामध्ये भारतीय संविधानाने 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत व बंधनकारक शिक्षण तसेच बालकामकार शोषणावर बंदी व मारहाणी पासून संरक्षण इत्यादी बालकांशी संबंधित तरतूदी करण्यात आल्या आहेत.

भारत सरकारने बालकांच्या कल्याणासाठी व सर्वांगिण विकासासाठी वेगवेगळ्या धोरणांची निर्मिती केली आहे.

**1) राष्ट्रीय बाल धोरण 1974 :-**

भारत सरकारने 1974 साली बालकांसाठी घेतलेल्या राष्ट्रीय धोरणाचा निर्णय बालकल्याणाच्या क्षेत्रामध्ये उचललेले एक महत्वपूर्ण पाऊल होते. या धोरणानुसार, बालके ही राष्ट्राची खरी सपंत्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या पालन-पोषणाची व विकासाची संपूर्ण जबाबदारी राष्ट्राची आहे. म्हणून शासकीय पातळीवरून ॲनिमीया व आयोडीन अभावी होणारे बालमृत्यु कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच बालकांच्या जन्मापूर्वी व जन्मानंतर आवश्यक असणाऱ्या संपूर्ण शारीरिक, मानसिक व सामाजिक विकासाच्या सेवा राज्याद्वारे पुरविण्याचे धोरण जाहीर केले.

**02) राष्ट्रीय आरोग्य धोरण 1983 :-**

राष्ट्रीय आरोग्य धोरणाच्या माध्यमातून देशातील साथीच्या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी राष्ट्रव्यापी लसीकरण अभियान राबविण्यात येईल. ज्यामुळे रोगराईचे निर्मूलन होईलच व त्याच बरोबर उपजत मृत्यु व बालमृत्युचे प्रमाण कमी होईल अशी आपेक्षा ठेवण्यात आली. तसेच समाजातील सुविधाहिन वर्गाकडे अधिक लक्ष देण्याच्या दृष्टीने गर्भवतीमाता, स्तनदामाता व बालकांच्या आरोग्यात सुधारणा करण्यासाठीच्या कार्यक्रमांना सर्वोच्च स्थान देण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले. याशिवाय आरोग्य सेवा उपलब्ध करून देणारे उपक्रम राबविण्यावर भर देण्यात आला.

**03) राष्ट्रीय शिक्षणिक धोरण 1986 :-**

14 वर्षापर्यंतच्या बालकांना शाळेत उपस्थित राहण्यासाठीच्या उपक्रमाला राष्ट्रव्यापी बनविणे. तसेच शैक्षणिक गुणवत्तेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने हे धोरण ठरविण्यात आले.

**04) राष्ट्रीय बालकार्य योजना 1992 :-**

राष्ट्रीय बालकार्य योजनेचे प्रमुख लक्ष्य सन 2000 पर्यंत शिशू मृत्युदर 60 पेक्षा कमी करणे व बालमृत्यु दर हजारी 10 पेक्षा कमी करणे हे होते.

**05) राष्ट्रीय पोषण धोरण 1993 :-**

पोषण हा अत्यंत संवेदनशील विषय असून तो विभिन्न स्तरावरून सोडविणे आवश्यक आहे. पोषण व विकास यांचा अत्यंत जवळचा संबंध असून ते एकमेकांवर परिणाम करीत असतात. त्यासाठी सुरक्षा व्यवस्थेचा विस्तार करणे महिलांमध्ये परिवर्तन घडवून आणणे, गर्भवती महिलांची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना संरक्षण व पोषण आहाराची पूर्तता करणे यासारखे कार्यक्रम राबविण्यात येतील.

**राष्ट्रीय पातळीवरून राबविण्यात आलेले कार्यक्रम :-**

1) कल्याणकारी विस्तार प्रकल्प (1954)
2) समन्वय कल्याणकारी विस्तार प्रकल्प
3) एकात्मिक बालकल्याणकारी मार्गदर्शक प्रकल्प.
4) कुटूंब व बालकल्याण प्रकल्प 1964.
5) उपयोजित पोषण कार्यक्रम 1963.
6) विशेष पोषण अहार उपक्रम 1970-71
7) राष्ट्रीय बालमंडळ 15 सप्टेंबर 1975
8) आंतरराष्ट्रीय बालक वर्ष
9) बालवाडी पोषण आहार कार्यक्रम 1970-71
10) प्रजनन तथा बाल स्वास्थ्य कार्यक्रम 1997
11) सार्वत्रिक लसीकरण कायक्रम 1985
12) पल्स पोलिओ अभियान - 1995
13) नवजात शिशू तथा बालरोग एकीकृत कार्यक्रम - 2001

याशिवाय अनेक योजना आरोग्य व पोषण आहाराच्या अनुषंगाने राबविण्यात आल्या आहेत. मात्र अद्यापही आपल्या देशात बालमृत्युचे प्रमाण(यूएनआयजीएमई) संस्थेने दिलेल्या अहवालानूसार जगभरात भारतात सर्वाधिक असल्याचे नमूद केले आहे. अहवालात दर दोन मिनिटांनी सरासरी तीन अर्भकांचा मृत्यु होते असे स्पष्ट करण्यात आले आहे.

**राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग :-**

संयुक्त राष्ट्रसंघात भारत हा एक कृतिशील सदस्य असल्यामुळे 11 डिसेंबर 1992 रोजी ``राईटस ऑफ द चाईल्ड`` या बालहक्काच्या जाहीरनाम्याला मान्यता दिली.

या अधिवेशनात ठरवली गलेली कर्तव्य पूर्ण करण्यासाठी भारतीय संसदेत `राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग कायदा 2005` हा महत्वाचा कायदा 2006 मध्ये करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले बालकांचे हक्क बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायद्याने केंद्र आणि राज्य पातळीवर आयोग स्थापन केले आहेत.

**बालन्यायालये :-**

मुलांविरूध्द अपराध किंवा त्यांचे हक्क भंग झाल्यावर त्यांना त्वरित न्याय मिळावा यासाठी उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या सल्ल्याने राज्यात निदान एक बालन्याय किंवा जिल्ह्यात एका सत्र न्यायालयाला बाल न्यायालयाचा दर्जा देवून तिथे सुनावणी केली जावी. तसेच प्रत्येक बालन्यायालयात बालकासंबंधीचे खटले चालविण्यासाठी राज्य शासनाला कमीत कमी सात वर्षांचा अनुभव असलेला एक वकील, सरकारी वकील म्हणून नेमावा लागतो.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani

**बाल संरक्षण समित्या :-**

'केंद्र पुरस्कृत एकात्मिक बाल संरक्षण योजना राज्य शासनाने राज्यात राबविण्यासाठी केंद्र शासनाबरोबर दि 13 ऑगस्ट 2010 रोजी सामंजस्य करार केलेला आहे.' या योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.त्या अंतर्गत 'राज्यदत्तक स्त्रोत संस्था (SARA) व 35 जिल्ह्यामध्ये जिल्हा बालसंरक्षण कक्षांची (DCPU) स्थापना देखील करण्यात आली आहे. बाल न्यायालय अधिनियम 2000 (2006) च्या कलम 62 अ व महाराष्ट्र बाल न्यायालय सुधारित नियम 2011 च्या कलम 14 नुसार या संस्थाची स्थापना करण्यात आली आहे.' बाल हक्कांविषयीच्या कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता जिल्हा, तलुका, नगर आणि ग्राम स्तरावर बाल संरक्षण समिती उभारण्याची तसेच तिची कार्ये पार पाडण्याची सुनिश्चिती करणे इ.बाबींचा अंतर्भाव जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या कार्यामध्ये केला आहे.'[4] –

**निष्कर्ष :-**

1) बाल हक्क कायद्यामुळे सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळत आहे.
2) बाल हक्क कायद्यामुळे बालकांच्या हक्काचे संरक्षण करणे सोपे होत आहे.
3) बाल हक्कांच्या संरक्षणासाठी शासकीय अनुदानावर अनेक बालसदन निर्माण करण्यात आले आहेत.
4) अशासकीय संस्था बालहक्कासाठी कार्य करीत आहेत.
5) बालहक्क कायद्यामुळे बालकांच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे.
6) बालहक्क कायद्यामुळे ग्रामीण भागात व अदिवाशी क्षेत्रातील बालकांना कुपोषणापासून दूर करण्यासाठी सकस आहार व औषधोपचार दिला जात आहे.

**समारोप :-**

आजचे बालक हे उद्याचे राष्ट्राचे आधारस्तंभ होणार आहेत. तेंव्हा या बालकांचे संगोपन उत्तम प्रकारे करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. त्यानूसार केंद्र व राज्य सरकार प्रयत्न करताना दिसून येतात. परंतु भारतातील बालकांविषयीची सद्य पस्थितीती पाहता यापेक्षाही अधिक प्रभावी कार्य करण्याची गरज असल्याचे निदर्शनास येते. कारण आजही भारतात बालमृत्युचे प्रमाण जगात सर्वात जास्त आहे. कुपोषित बालकांची संख्या जास्त आहे. बालमजूरी करणाऱ्या बालकांचीही संख्या अधिक असल्याचे दिसून येते. तेंव्हा या सर्व बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी अधिक प्रभावी योजनांची आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :-**

1) मानवी हक्कातील मूलभूत संकल्पना - यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक पृ.क्र.7
2) डॉ.राजशेखर सोलापुरे - मानवी हक्क आणि समाज, अरूणा प्रकाशन लातूर 2014 पृ.क्र.15
3) उपरोक्त पृ.क्र.16
4) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. ICPS 2014/प्र.क्र.23/का.8

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani